Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
QUARTERLY
RESEARCH JOURNAL

Volume - XI, Issue - II
April - June - 2022
MARATHI

Impact Factor / Indexing
2020 - 6.306
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with OKEN Scanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - II April - June - 2022

MARATHI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with OKEN Scanner

# EDITORIAL BOARD


**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

**Dr. Vilas A. Gaikwad**
Chief Editor, HOD, Public Administration
M.S.Gote College Wahim

**Dr. G. Kubade**
Principal
M.S.Gote College Wahim

**Dr. Prachi Patharkar**
IQAC Coordinator
M.S.Gote College Wahim

**Dr. Vedprakash Dongaonkar**
Chairman ,Research Committee
M.S. Gote College, Washim

**Dr. V. B. Chandajkar**
HOD,Political Science
M.S. Gote College, Washim

**Dr. Priti Pohekar**
HOD, Public Administration
Rajarshi Shahu Mahavidhyalya (Autonomous)

**Dr. Bheem Rao Jhade**
Asst.Prof. of Public
Administration, Principal, Government
Degree College,Nirmal Telegana



PUBLISHED BY

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)


Scanned with OKEN Scanner

# CONTENTS OF MARATHI


| अ. क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरण व अंतर्गत सुरक्षा विषयक धोरण<br>**प्रा. डॉ. कदम संतोष तुकाराम** | १-५ |
| २ | मोदींचे परराष्ट्र धोरण : सातत्य की स्थित्यंतर?<br>**डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत** | ६-१२ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परराष्ट्रीय धोरणविषयक विचार<br>**प्रा. कांबळे के. जे.** | १३-१६ |
| ४ | पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या परराष्ट्र धोरणाचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. विकास बी. चांदजकर** | १७-२१ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परराष्ट्रीय धोरण विषयक दृष्टीकोन<br>**डॉ. प्रमोदकुमार केशव नंदेश्वर** | २२-२७ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरण विषयक विचार<br>**रविकिरण बसंतराव सदानशिव** | २८-३३ |
| ७ | भारतीय परराष्ट्र धोरणावर नवीन आर्थिक धोरणाचा झालेला परिणाम<br>**डॉ. सुरेश बळीराम गजभारे** | ३४-३७ |
| ८ | मोदींचे परराष्ट्र धोरण बद्दल किंवा सातत्य<br>**प्रा. सुरेन्द्र हरिभाऊ किन्हीकर** | ३८-४२ |
| ९ | भारत-चीन संबंध : चीनचे विस्तारवादी धोरण आणि त्याचे भारतावरील परिणाम<br>**प्रा. डॉ. सुधिर नारायणराव देशमुख** | ४३-४४ |
| १० | कोविड १९ नंतरची भारतातील मानसिक आरोग्य आणि औद्योगिक स्थिती<br>**प्रा. डॉ. गणेश वायकोस** | ४५-४९ |
| ११ | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल आणि आव्हाने<br>**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे** | ५०-५५ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरणावरील विचार<br>**डॉ. मुट्ठे पी. आर.**<br>**कदम आर. बी.** | ५६-५९ |


Scanned with OKEN Scanner

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) 

# ८. मोदींचे परराष्ट्र धोरण बद्दल किंवा सातत्य

प्रा. सुरेन्द्र हरिभाऊ किन्हीकर
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती.

गोषवारा

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेण्यात येत आहे. यामध्ये परराष्ट्र धोरणाचा अर्थ आपण पाहणार आहोत. देशाच्या आर्थिक, सामाजिक प्रगतीसाठी जगातील देशांची मैत्रीपूर्ण संबंध असणे महत्वाचे आहे. राष्ट्राच्या राज्यसंस्थेचा प्रकार, अर्थव्यवस्थेचे स्वरूप व गरजा, राजकीय परिस्थिती, भौगोलिक स्थान आणि सांस्कृतिक जडणघडण यांच्या संयुक्त साच्यातून परराष्ट्र धोरणाला आकार प्राप्त होतो. आधुनिक काळात राज्यांना आपापल्या राष्ट्र हितांचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी परराष्ट्र धोरण आखण्याची आवश्यकता निर्माण झाली. भारताच्या परराष्ट्र धोरणाची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व काळात झाली. इंग्रजांच्या परराष्ट्र धोरणावर टीका करून राष्ट्रीय चळवळीतील धुरीणांनी सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सहअस्तित्व या तत्वावर आधारित परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यप्राप्ती पासून ते आज पर्यंत देशाच्या परराष्ट्र धोरण निर्मितीवर पंतप्रधानांचा विशेष प्रभाव दिसून येतो. भारतीय परराष्ट्र धोरणाचे जनक पंडित नेहरूंनी जो भारत उभा केला आणि आज जो वारसा आपल्याला मिळाला, तो जगातील क्वचितच देशांना मिळाला असेल. त्यामुळेच या शोधनिबंधामध्ये नेहरूंनी परराष्ट्र धोरण म्हणजे आपल्याला नेमकं काय दिलंय ? याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारताचे स्वतंत्र देशाचे पहिले पंतप्रधान पंडीत नेहरुंचे परराष्ट्र धोरण पाहणार आहोत सोबतच आजचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण यांनी नेहरू च्या परराष्ट्र धोरणामध्ये कोणता बदल केला आहे वा सातत्य राखले आहे यावर प्रकाश टाकणार आहे .

**परराष्ट्र धोरण म्हणजे काय ?**

प्रत्येक राज्य आपणास इष्ट वर्तन इतर राज्यांनी, यासाठी आपल्या मर्यादित प्रभावाचा विविध स्वरूपात वापर करून त्या-त्या राज्यातील राज्यकर्त्यांचे मन वळवीते यालाच स्थूलमानाने परराष्ट्रीय धोरण म्हणता येईल.

देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी इतर देशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखणे महत्त्वाचे आहे, असे संबंध विशिष्ट तत्त्वे आणि धोरणावर आधारित असतात अशा तत्वे आणि धोरणांना परराष्ट्र धोरण म्हणता येईल.

**परराष्ट्र धोरणाची सर्वसाधारण उद्दिष्टे**

- देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करणे.

- देशाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी बाह्य शक्तींना आवश्यक त्या प्रमाणे प्रभावित करणे.
- इतर देशांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या देशाच्या नागरीकांची सुरक्षा आणि कल्याण बाबत योग्य ती पावले उचलणे.
- इतर देशांशी सांस्कृतिक संबंध बळकट करणे.
- इतर देशांशी व्यापार वाणिज्य, तंत्रज्ञान, शिक्षण, पर्यावरण, क्रीडा इत्यादी सर्व क्षेत्रामध्ये संपर्क वाढवून देशाच्या अर्थव्यवस्थेस त्याचा लाभ पोहोचविणे.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंचे परराष्ट्र धोरण

भारताचे प्राचीन काळापासून जगातील इतर देशांशी सौहार्दाचे संबंध होते, पण ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांच्या वसाहतवादी हेतूने प्रेरित परराष्ट्र धोरणामुळे इतर देशांशी असणाऱ्या संबंधांमध्ये बदल झाला. स्वातंत्र्यप्राप्ती पासून ते आजपर्यंत परराष्ट्र धोरण निर्मितीवर पंतप्रधानांचा विशेष प्रभाव दिसून येतो. नेहरूंचे चरित्रकार मायकेल ब्रेशर यांच्या मते, नेहरू हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार होत इतकेच नव्हे तर परराष्ट्रीय धोरण ही त्यांची मक्तेदारी होती. एका अर्थाने हे खरे आहे काँग्रेसने 1928 मध्ये परराष्ट्र धोरणासाठी स्वतंत्र विभाग सुरू केल्यापासून त्याची धुरा पंडित नेहरूंनी अखेरपर्यंत सांभाळली. ब्रिटिश गेल्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित नेहरू यांनी सूत्रे हातात घेतली, तेव्हा त्यांच्या समोर देशाची आर्थिक परिस्थिती सुधरवणे हे मोठं आव्हान तर होतेच पण जगात ब्रिटिश भारत किंवा ब्रिटिश इंडिया हे जी ओळख मिळाली होती ती पुसणं आणि स्वतःचं अस्तित्व निर्माण करणं ही सर्वात मोठी जबाबदारी होती, कारण सामाजिक आर्थिक परिस्थिती सुधरवण्याचा मार्ग यातून तयार होतो. पंडित नेहरूंच्या रूपाने एक युगपुरुष आपल्याकडे होता ज्याने त्यांच्या दूरदृष्टीने देशाला फक्त ओळख निर्माण करून दिली नाही तर तिची ओळख आणि प्रतिमा निर्माण केली ती आजपर्यंत आपल्याला वारसा म्हणून जगात उपयोगी ठरत आहे. ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणावर टीका करून राष्ट्रीय चळवळीतील व्यक्तींनी सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सह-अस्तित्व या तत्वावर आधारित परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार नेहरूंनी ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणातील कटू अनुभवापासून बोध घेत देशाचे परराष्ट्र धोरण आखलं. अलिप्ततावाद, वसाहतवाद आणि साम्राज्यवादाला विरोध, वर्णद्वेष विरोध, जागतिक शांतता, प्रादेशिक सहकार्य, निशस्त्रीकरणाला पाठिंबा इ. भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्त्वे आहेत.

नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये वसाहतवाद जो इंग्रजांनी केला, त्याचा कायम विरोध केला. त्यामुळेच भारत स्वतंत्र झाल्यानंतरही या गोष्टीपासून दूर राहिला. वसाहतवादामुळे आंतरराष्ट्रीय शांततेचा भंग होतो आणि दुर्बल घटकाचं म्हणजे गरीब देशांच यातून शोषण होतं असे नेहरूंच मत होतं त्यामुळेच

भारताने इंडोनेशिया, मलाया, ट्युनिशिया, अल्जेरिया, घाना व निमीबिया यासारख्या आफ्रिकन-आशियन देशांच्या मुक्ती मोहिमेला पाठिंबा दिला.

भारतीय परराष्ट्र धोरणात नेहरूंनी काळा आणि गोरा यांच्यातील वादाची मोठ्या प्रमाणात काळजी घेतली. झिम्बाब्वे आणि आताच्या रोडेशियाची वंशवादापासून सुटका करण्यापासून भारताने महत्त्वाची भूमिका निभावली.

अलिप्ततावाद हा नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचा महत्त्वाचा मुद्दा होता भारत 1947 ला स्वतंत्र झाला तेव्हा जग दोन गटांमध्ये विभागलेलं होतं. एक गट होता भांडवलदारांचा ज्याचे नेतृत्व अमेरिकेकडे होतं तर दुसरा गट समाजवादी होता ज्याचे नेतृत्व सोवियत रशिया कडे होतं. या परिस्थितीमध्ये भारताने कोणत्याही गटाच्या जवळ न जाण्याचा निर्णय घेतला.

नेहरूंनी 1954 मध्ये इंडो चीनचा तिबेट विषयीचा जो करार केला त्यानंतर जारी केले पाच तत्व त्याला पंचशील तत्व म्हणून ओळखतात, ते जगासाठी आदर्श बनले या तत्त्वांचा म्यानमार, इंडोनेशिया आणि युगोस्लाव्हिया या सारख्या देशांनी स्वीकार केला आणि जगभरात या तत्वाचं महत्त्व वाढलं.

भारताने शांततेसाठी नेहमीच अग्रेसर भूमिका घेतली आणि जेव्हा भारत अण्वस्त्र सज्ज देश झाला तेव्हा ही कायम राहिली. विनाशकारी महायुद्धे पुन्हा होऊ नयेत, राष्ट्रा राष्ट्रातील प्रश्न सामंजस्याच्या मार्गाने सुटावेत यासाठी संयुक्त राष्ट्र संघ निर्माण झाला होता. युनोच्या माध्यमातून निशस्त्रीकरण परिषदा दुर्बल राष्ट्रांना सहकार्य अशा उपक्रमांना भारताने सक्रिय साहाय्य केले. नेहरुंच्या काळात भारत युनोचा क्रियाशिल सदस्य झाला.

अशाप्रकारे नेहरूंच्या इ.स. 1947 ते 1964 या काळातील परराष्ट्र धोरणाचे हे मुख्य मुद्दे होते.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण**

वर्तमान मोदी सरकारने अगोदरपासूनच जगातील जवळपास सर्वच देशांशी मैत्रीपूर्ण संबंध जपले आहेत. पंतप्रधान मोदींनी भारतीय परराष्ट्र धोरणाला एक निश्चित चेहरा प्राप्त करून दिला आहे. स्वप्नाळू पंचशील ते क्रियाशील पंचसूत्री असा परराष्ट्र धोरणाचा प्रवास २०१४ ते २०१९ या दरम्यान झाला. "राष्ट्रप्रथम" अशा मूलभूत भूमिकेतून आंतरराष्ट्रीय समुदायाशी प्रस्थापित होणारे संबंध प्रभावी ठरत आहे. परदेशी भारतीयांना नरेंद्र मोदी यांनी घातलेल्या सादेला मिळणारा प्रतिसाद उस्फुर्त आहे. आखाती देशात वंदे मातरम् चे सुर उमटणे, तेथे मंदिर निर्मिती होणे आणि योग दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा होण्यास सुरुवात होणे अशी उदाहरणे मोदींच्या परराष्ट्र धोरणाची दिसून येतात. मोदींच्या परराष्ट्र धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी परराष्ट्र धोरणात अलिप्ततावादाच्या पिंजऱ्यातून बाहेर काढले आणि राष्ट्रहिताशी संलग्न केले. दोन गटात विभागल्या गेलेल्या जगात दोनही गटापासून एकसमान अंतर ठेवणे, भारताची प्रतिमा उंचाविण्यासाठी इंटरनेट आणि समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर या सगळ्यांच्या एकत्रीकरणातून परराष्ट्र धोरणाची मोदी नीती समोर आली आहे.

इ. स. १९४५ नंतर जग हे दोन बलाढ्य महाशक्ती मध्ये विभाजित झालेले असताना देशाच्या पहिल्या प्रधानमंत्र्यांनी आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने तसेच दूरदृष्टीकोणातुन दोन्ही महाशक्तिशाली गटात सहभागी न होता स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यासाठी आपला वेगळा अलिप्ततावादी गट तयार केला. आजही रशिया-युक्रेन च्या युद्धाबाबत काही प्रमाणात आजच्या पंतप्रधानांनी आपली तटस्थ भूमिका घेतली दिसते.

परराष्ट्र धोरणावर मोठ्याप्रमाणावर भर देणारे स्वतंत्र भारताच्या इतिहासात पंडित जवाहरलाल नेहरू नंतर मोदी हे दुसरे पंतप्रधान आहेत. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारताच्या आर्थिक विकासाचे एक साधन म्हणून परराष्ट्र धोरणाचा वापर कशाप्रकारे केला जाईल या दृष्टिकोनातून परराष्ट्र धोरण याकडे पाहिले जात आहे.

पंतप्रधान मोदी सरकारने जो “मेक इन इंडिया” हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे तो यशस्वी होण्यासाठीही परराष्ट्र धोरणाचा साधन म्हणून वापर केला जात आहे. मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणामध्ये दक्षिण आशिया ला सर्वाधिक महत्त्व आहे. त्यानुसार सरकारने सर्वात आधी दक्षिण आशियाई देशांशी संबंध घनिष्ठ करण्याचे उद्दिष्ट ठेवत त्यानुसार पावलेही उचलली. पंतप्रधान मोदी यांनी सर्वप्रथम आपल्या परराष्ट्र दौऱ्याची सुरुवात आपल्या शेजारील भूतान सारख्या छोट्या देशापासून केली त्यानंतर नेपाळमध्ये आपला दौरा केला.

भारत आणि बांगलादेश यांच्यातील भू-सीमा रेषा करार गेल्या 40 वर्षांपासून प्रलंबित आहे. तो पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन हा करार पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती घटना दुरुस्ती संसदेकडून एकमताने मंजूर करून घेतली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी श्रीलंकेतील सर्वात मोठ्या बौद्ध धर्मगुरूंना भारत भेटीचे निमंत्रण दिले तसेच तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांची नालंदा येथे एक ऐतिहासिक भेट घडवून आणली. भारताने आशिया खंडातील छोट्या-छोट्या देशांमध्ये बेटांच्या विकासाचे कार्यक्रम हाती घेतले आहेत. इतर देशांसोबत मैत्रीपूर्ण संबंधावर भर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शपथविधि कार्यक्रमातूनच घेतली.

Covid-19 च्या संकटातील संधी शोधणाऱ्या भारताने गेल्या काही दिवसात जागतिक स्तरावर आपली छाप पाडली. त्यासाठी नाम आणि सार्क परिषदेच्या व्यासपीठाचा वापर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला तसेच जी 20 देशांच्या व्यासपीठावरही मोदींनी आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला.

नाम च्या 53 सदस्य देशांसह एकंदर 153 देशांना भारताने करोनावर गुणकारी विकास ठरू शकणारी औषधे, वैद्यकीय साहित्य यांची मदत पुरविली. भारतीय उपखंडात करोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी दहा दशलक्ष डॉलरचा सार्क Covid-19 निधी उभारण्यासाठी प्रयत्न केला.



Scanned with OKEN Scanner

निष्कर्ष

प्रस्तुत शोधनिबंधातील तथ्यांचे सविस्तर अध्ययन केले असता १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाल्यापासून आजपर्यंतच्या भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार केल्यास आजच्या परराष्ट्र धोरणाचा पाया हा पहिल्या पंतप्रधानाच्या परराष्ट्र धोरणावर उभा आहे असे दिसते परंतु भारत आपल्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतांना जगाच्या नकाशावर आज आपल्या सक्षम परराष्ट्र धोरणामुळे जगातील पहिल्या पाच बलाढ्य देशांमध्ये गणला जातो. त्याचे कारण देखील भारताचे परराष्ट्र धोरण मानले जाते. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी दुसऱ्या महायुद्धानंतर जग दोन गटात विभागले गेले असताना पंडित नेहरू यांनी कोणत्याही गटात सामील न होता अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला व जगातील इतर देशांसोबत मिळून अलिप्ततावादी गट तयार केला. परंतु आजच्या पंतप्रधानांनी नेहरूंचा अलिप्ततावाद पूर्णतः न स्वीकारता राष्ट्रहिताचा विचार करून जगातील दोनही महासत्ता सोबत चांगले संबंध ठेवण्यावर भर दिला हे या शोधनिबंधावरून लक्षात येते.

संदर्भसूची

१. बलराम नंदा, (अनुवाद : वासंती फडके), नेहरू : मोतीलाल, जवाहरलाल, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८७.
२. एस. गोपाल, (अनुवादः पुरुषोत्तम चित्रे), जवाहरलाल नेहरू, साहित्य अकादमी,
३. दैनिक लोकसत्ता, ६ जुलै २०२१.
४. महाराष्ट्र टाईम्स, २२ मे २०१७.
५. महाराष्ट्र टाईम्स, २३ ऑक्टोबर २०१५.

Scanned with OKEN Scanner